# प्रेस नोट

दिनांक:— २४/०१/२०२०

फिर्यादी यांचेकडे सदनिका नांवावर करून घेण्यासाठी आलेल्या सदनिका खरेदीदाराचे नांव नोंदणीकरीता यातील लोकसेवकांनी फिर्यादी यांचेकडे प्रथम रु. ८०००/— ची मागणी करुन सापळा/पडताळणी कारवाई दरम्यान रु. ९०००/— लाचेची मागणी करून ती स्विकारली म्हणून गुन्हा नोंद.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्र. | ०६/२०२० |
| कलम | ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १) श्रीमती कविता हिरांसिंग राठोड वय ५१ वर्ष, व्यवसाय—नोकरी, मिळकत व्यवस्थापक, म्हाडा, बांद्रा पुर्व मुंबई (वर्ग—०२)<br>२) नरेश रामचंद्र गावडे वय ४७ वर्षे, धंदा—नोकरी, सहाय्यक, म्हाडा, बांद्रा पुर्व मुंबइ (वर्ग—०३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. ८,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रू. ९,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी हे रियल इस्टेट एजंट असून ते मानखुर्द, गोवंडी मुंबई या विभागात काम करतात. फिर्यादी यांनी त्याचेकडे सदनिका नांवावर करून घेण्यासाठी आलेल्या सदनिका खरेदीदाराचे नांव नोंदणीकरीता (नियमितीकरणाकरीता) म्हाडा कार्यालयात अर्जासह कागदपत्रे सादर केली होती.<br><br>आरोपीत लोकसेवक यांनी खरेदीदाराचे नांव नोदणीकरीता (नियमीतीकरणाकरीता) त्यांचे म्हाडा कार्यालयात फिर्यादीकडे दिनांक १७/०१/२०२० रोजी ८०००/— रूपयाच्या लाचेची मागणी केली होती, परंतु फिर्यादी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी २०/०१/२०२० रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे तक्रार अर्ज केला होता.<br><br>फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक २२/०१/२०२० रोजी पडताळणी/सापळा कारवाई दरम्यान आरोपीत लोकसेवकांनी रूपये ९०००/— लाचेची मागणी करुन आरोपीत लोकसेविका क्र. ०१ यांनी रूपये ५०००/— व आरोपीत लोकसेवक क्र.०२ यांनी रूपये ४०००/—ची लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडले. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाकडे संपर्क साधावा.


संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई— ४०० ०३०.

संकेतस्थळ — **acbmaharashtra.gov.in**

ईमेल : **(1) acbwebmail@mahapolice.gov.in, (2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन - **www.acbmaharashtra.net**

टोल फ्री क्र. १०६४

दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,

व्हॉट्स ॲप क्रमांक —९९३०९९७७००


अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सत्यमेव जयते, बृहन्मुंबई

( रमेश धुमाळ )
अपर पोलीस उप आयुक्त (१)
ला.प्र.वि., मुंबई विभाग.

Scanned with CamScanner